नाशिक
दि. १८/०३/२०२१

# प्रेसनोट

## आलोसे क्र १) प्रकाश माधवराव चव्हाण, बिगारी कर्मचारी, २) राजेंद्र पुंडलिक निगळ, बिगारी कर्मचारी दोन्ही नेमणुक नाशिक महानगरपालिका, विभागीय कार्यालय नविन नाशिक सिडको,ता. जि.नाशिक यांना ५००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना ला.प्र.वि. नाशिक विभागाची कारवाई

| | |
|---|---|
| घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही चालु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | १) प्रकाश माधवराव चव्हाण, बिगारी कर्मचारी,<br>२) राजेंद्र पुंडलिक निगळ, बिगारी कर्मचारी<br>दोन्ही नेमणुक नाशिक महानगरपालिका, विभागीय कार्यालय नविन नाशिक सिडको, ता.जि.नाशिक. |
| मागणी कलेली लाचेची रक्कम | ५००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५००/— रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे जुने सिडको महानगरपालिकेच्या दवाखान्यासमोर टाटा सुपर मिन्ट (छोटा हत्ती) या गाडीतून कांदा, बटाटा विक्री करीत असतांना नाशिक महानगरपालिका, विभागीय कार्यालय नविन नाशिक सिडको अतिक्रमण विभागातील वाहनावरील बिगारी कर्मचारी प्रकाश माधवराव चव्हाण यांनी तक्रारदार यांच्या गाडीतील वजनकाटा जप्त केला. सदर वजनकाटा परत करण्यासाठी व तक्रारदार यांचेवर कोणतीही कारवाई न करण्यासाठी तक्रारदार यांचेकडून २००/— रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि.नाशिक पथकाने पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता **आलोसे क्र १)** प्रकाश माधवराव चव्हाण, बिगारी कर्मचारी, नेमणुक नाशिक महानगरपालिका, विभागीय कार्यालय नविन नाशिक सिडको,ता.जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेवर कोणतीही कारवाई न करता वजनकाटा परत करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे ५००/— रुपये लाचेची मागणी करून **आलोसे क्र.२)** राजेंद्र पुंडलिक निगळ, बिगारी कर्मचारी नेमणुक नाशिक महानगरपालिका, विभागीय कार्यालय नविन नाशिक सिडको,ता.जि.नाशिक यांचे हस्ते यांनी आज दि. १८/०३/२०२१ रोजी सदर लाचेची रक्कम पंच साक्षीदारांसमक्ष अंबड पोलीस स्टेशन समोरील नाशिक महानगरपालिका, नविन नाशिक सिडको नाशिक विभागीय कार्यालयाचे आवारात स्विकारली असता दोघांना पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालय
संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in
ई—मेल : spacbnasik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbmaharastra.net
टोल फ्री क्र. : १०६४
दुरध्वनी क्र. : ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

Vadhav 18·03·21
( विजय जाधव )
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता